# माध्यमिक शाळा शिष्यवृत्ती (HSS) परीक्षा (इयत्ता ७वी)

## * ऑनलाईन आवेदनपत्र भरण्याबाबत मुद्देनिहाय सूचना *

**(शाळेने विद्यार्थ्यांची माहिती जनरल रजिस्टरमधील नोंदीप्रमाणे अचूकपणे भरावी.)**

**शाळेच्या विद्यार्थी यादीतील अ.क्र. (Student SR. No. in students list) -**

- या चौकटीत काहीही नोंदवू नका (टाईप करु नका) आपल्या शाळेच्या जेवढया विद्यार्थ्यांची ऑनलाईन आवेदनपत्रे भरण्यात येतील/आली असतील, त्यांना आपोआप ऑनलाईन सिस्टिमकडून अनुक्रमांक (सिरियल नंबर) दिला जाईल.

**विद्यार्थ्याचे नाव (Students Name) -**

- **आडनांव (Last Name)** - इंग्रजी कॅपिटल लेटर्समध्ये टाईप करा.
- **प्रथम नाव (First Name)** - इंग्रजी कॅपिटल लेटर्समध्ये टाईप करा.
- **वडिलांचे नाव (Father's Name)** - इंग्रजी कॅपिटल लेटर्समध्ये टाईप करा.
- **आईचे नाव (Mother's Name)** - इंग्रजी कॅपिटल लेटर्समध्ये टाईप करा.
- इंग्रजी कॅपिटल लेटर्स शिवाय इतर कोणतीही लिपी (देवनागरी - मराठी/हिंदी, इ..) वापरु नये.

**लिंग (Gender) -**

- मुलगा/मुलगी या पैकी अचूक पर्याय निवडा.

**आरक्षणाचा प्रवर्ग (Reservation category) -**

- शाळेच्या जनरल रजिस्टरमधील नोंदीप्रमाणे जातीनुसार आरक्षणाचा प्रवर्ग ड्रॉपडाऊन लिस्टमधून अचूकपणे निवडा. [ड्रॉप डाऊन लिस्ट - अनुसूचित जाती (SC), अनुसूचित जमाती (ST), विमुक्त जाती - अ (VJ-A), भटक्या जमाती - ब (NT-B), भटक्या जमाती - क (NT-C), भटक्या जमाती - ड (NT-D), विशेष मागास प्रवर्ग (SBC), इतर मागास वर्ग (OBC), शैक्षणिक सामाजिक मागास प्रवर्ग (ESBC), विशेष मागास प्रवर्ग - अ (SBC-A), खुला (OPEN)]

**लक्षात ठेवा -**

- महाराष्ट्र शासनाचा (MSCERT) अभ्यासक्रम राबविणाऱ्या शाळांतील SC, ST, VJ-A, NT-B, NT-C, NT-D या प्रवर्गातील विद्यार्थ्यांना परीक्षा शुल्क नाही. (मात्र ही सवलत CBSE/ICSE/इतर अभ्यासक्रमांच्या शाळांतील मागासवर्गीय विद्यार्थ्यांना नाही.)
- कोणताही अभ्यासक्रम राबविणाऱ्या शाळांतील उर्वरित (SBC, OBC, ECBS, SBC-A, OPEN) या प्रवर्गातील विद्यार्थ्यांना परीक्षा शुल्क भरावे लागेल.
- चुकीचा आरक्षण प्रवर्ग नोंदविणाऱ्या शाळेच्या मुख्याध्यापकांविरुद्ध शिस्तभंगाची कारवाई प्रस्तावित केली जाईल
- महाराष्ट्र शासनाचा (MSCERT) अभ्यासक्रम राबविणाऱ्या शाळांतील मागासवर्गीय (SC, ST, VJ-A, NT-B, NT-C, NT-D) या प्रवर्गातील विद्यार्थ्यांचा H आणि I शिष्यवृत्ती संचासाठी गुणवत्तेनुसार विचार केला जातो. म्हणून आरक्षण प्रवर्ग अचूक नोंदविणे आवश्यक आहे.
- शिष्यवृत्ती संचांचे प्रकार आणि शिष्यवृत्ती अर्हता प्रदान करण्याचे निकष यांचा तक्ता परिषदेच्या संकेतस्थळावर उपलब्ध आहे, तो पहावा.

**जन्मदिनांक (Date of Birth) -**

- शाळेच्या जनरल रजिस्टरमधील रेकॉर्डप्रमाणे Day, Month, Year या स्वरुपात संबंधित चौकोनात विद्यार्थ्यांची जन्मतारीख नोंदवा. (ड्रॉप डाऊन लिस्टमधून दिवस, महिना, वर्ष निवडा)
- **कमाल वयोमर्यादा -**
    - विद्यार्थ्यांचे वय परीक्षेस बसण्याच्या कमाल विहित वयोमर्यादेपेक्षा जास्त असल्यास स्क्रीनवर 'शिष्यवृत्तीसाठी अपात्र' (Not qualified for scholarship) असा संदेश दिसेल.
    - विहित कमाल वयोमर्यादेपेक्षा अधिक वय असलेल्या विद्यार्थ्यांना आवेदनपत्र भरता येईल तसेच परीक्षेस प्रविष्ट होता येईल.
    - मात्र अशा विद्यार्थ्यांना परीक्षेत कटऑफ इतके/कटऑफ पेक्षा अधिक गुण मिळाले तरीही शिष्यवृत्ती अर्हताधारक घोषित केले जाणार नाही याची नोंद घ्यावी.

**परीक्षेचे माध्यम (Medium for Examination) -**

- शाळा माहिती प्रपत्र भरतेवेळी निवडलेली माध्यमे येथे उपलब्ध होतील.
- उपलब्ध असलेल्या माध्यमांपैकी विद्यार्थी ज्या माध्यमातून परीक्षेस प्रविष्ट होणार आहे ते माध्यम निवडा.
- सेमी इंग्रजी माध्यम निवडल्यास विद्यार्थ्यांना परीक्षेच्या वेळी केवळ पेपर क्र. २ (गणित व सामाजिक शास्त्र) आणि पेपर क्र. ३ (बुद्धिमत्ता चाचणी व सामान्य विज्ञान) या दोन पेपरची मूळ माध्यमाची आणि इंग्रजी माध्यमाचीही प्रश्नपत्रिका मिळेल.

**विद्यार्थी शिकत असलेला अभ्यासक्रम (Student studying the course) -**

- शाळा माहिती प्रपत्र भरतेवेळी शाळेचा जो/जे अभ्यासक्रम निवडला/ले होता/होते. तो/ते अभ्यासक्रम स्क्रीनवर येथे उपलब्ध होईल/होतील.
- त्यापैकी विद्यार्थी सध्या शाळेत शिकत असलेला अभ्यासक्रम अचूकपणे निवडा.
- **लक्षात ठेवा -**
    - महाराष्ट्र शासनाच्या अभ्यासक्रमात (MSCERT) शिक्षण घेत असलेल्या विद्यार्थ्यांचा गुणवत्तेनुसार शिष्यवृत्तीसाठी विचार केला जातो.
    - चुकीचा अभ्यासक्रम नोंदविल्यास विद्यार्थी शिष्यवृत्तीस अपात्र घोषित केला जाईल व संबंधित शाळेच्या मुख्याध्यापकांविरुद्ध शिस्तभंगाची कारवाई प्रस्तावित केली जाईल.

**विद्यार्थ्याचे वडील/पालक भूमिहीन शेतमजूर आहेत काय? (Is Father/Parent of Student a Landless labour?) -**

- पालक भूमिहीन शेतमजूर असल्यास होय पर्याय निवडावा. नसल्यास नाही हा पर्याय निवडावा.
- पालक भूमिहीन शेतमजूर असल्यास त्याबाबत सक्षम अधिकाऱ्याचे प्रमाणपत्र शाळेने प्रपत्र 'अ' सोबत जोडावे.
- संबंधित विद्यार्थ्याकडे हे प्रमाणपत्र उपलब्ध नसेल तर 'होय' हा पर्याय निवडू नये.
- पालक भूमिहीन शेतमजूर असल्यास C संच प्रकारासाठी विद्यार्थ्याचा गुणवत्तेनुसार शिष्यवृत्ती अर्हतेसाठी विचार केला जातो.
- शिष्यवृत्ती संचांचे प्रकार आणि शिष्यवृत्ती अर्हता प्रदान करण्याचे निकष यांचा तक्ता परिषदेच्या संकेतस्थळावर उपलब्ध आहे, तो पहावा.

**वडिलांचे/पालकांचे वार्षिक उत्पन्न (Father/Parents Annual Income) -**

- रु. २०,०००/-(वीस हजार रुपये) पर्यंत किंवा रु. २०,०००/- (वीस हजार रुपये) पेक्षा जास्त यापैकी अचूक पर्याय निवडा.
- संबंधित विद्यार्थ्याकडे हे प्रमाणपत्र नसल्यास उत्पन्न रु. २०,०००/- (वीस हजार रुपये) पेक्षा कमी हा पर्याय निवडू नये.
- उत्पन्न रु. २०,०००/- (वीस हजार रुपये) पर्यंत असल्यास सक्षम अधिकाऱ्याचे संबंधित विद्यार्थ्याच्या पालकाचे प्रमाणपत्र शाळेने 'प्रपत्र अ' (List of Applicants) सोबत जोडावे.
- F, G, H, I आणि C या शिष्यवृत्ती संच प्रकारासाठी पालकांचे उत्पन्न रु. २०,०००/- पर्यंत असलेल्या विद्यार्थ्यांचा गुणवत्तेनुसार विचार केला जातो.
- शिष्यवृत्ती संचांचे प्रकार आणि शिष्यवृत्ती अर्हता प्रदान करण्याचे निकष यांचा तक्ता परिषदेच्या संकेतस्थळावर उपलब्ध आहे, तो पहावा.

**अपंग आहे का? (Differently abled - disable) -**

- होय/नाही पैकी अचूक पर्याय निवडा.
- होय पर्याय निवडल्यास लेखनिक हवा का? (Need a writer?) असा प्रश्न स्क्रीन वर येईल.
- लेखनिक हवा असल्यास होय (Yes) हा पर्याय निवडा, नको असल्यास नाही (No) हा पर्याय निवडा.
- लेखनिकास शिक्षणाधिकारी (प्राथमिक) यांची परीक्षेपूर्वी किमान ८ दिवस अगोदर शाळेने मान्यता घ्यावी.

**आधार कार्ड क्रमांक (Adhar Card No.) -**

- विद्यार्थ्यास आधार कार्ड मिळाले असल्यास त्यावरील १२ अंकी कार्ड क्रमांक टाईप करावा. नसल्यास हा चौकोन रिकामा ठेवावा.

**शुल्क (Fee) -**

- ऑनलाईन आवेदनपत्रात शुल्क, परीक्षा शुल्क, एकूण शुल्क आपोआप गणले जाऊन संबंधित चौकटीत नोंदविले जाईल.

**लक्षात ठेवा -**

- **ऑनलाईन आवेदनपत्र शुल्क -**
  - सर्व विद्यार्थ्यांना (मागासवर्गीय व बिगर मागासवर्गीय) रु.१०/- आहे.

- **परीक्षा शुल्क -**
  - महाराष्ट्र शासनाचा (MSCERT) अभ्यासक्रम राबविणाऱ्या शाळांतील SC, ST, VJ-A, NT-B, NT-C, NT-D या प्रवर्गातील विद्यार्थ्यांना परीक्षा शुल्क नाही. मात्र ही सवलत CBSE/ICSE/इतर अभ्यासक्रमाच्या शाळांतील मागासवर्गीय विद्यार्थ्यांना नाही.
  - उर्वरित प्रवर्ग (SBC, OBC, ECBS, SBC-A, OPEN) या प्रवर्गातील विद्यार्थ्यांना रु.५०/- परीक्षा शुल्क भरावे लागेल.

- **विलंब शुल्क -**
    - नियमित शुल्कासह आवेदनपत्र भरण्याची मुदत संपल्यानंतर सर्व माध्यमाच्या, सर्व व्यवस्थापनाच्या, सर्व अभ्यासक्रमाच्या शाळांतील विद्यार्थ्यांना (बिगर मागास व मागास) रु. ५०/- इतके विलंब शुल्क भरावे लागेल.

- **अतिविलंब शुल्क -**
    - विलंब शुल्कासह आवेदनपत्र भरण्याची मुदत संपल्यानंतर सर्व माध्यमाच्या, सर्व व्यवस्थापनाच्या, सर्व अभ्यासक्रमाच्या शाळांतील विद्यार्थ्यांना (बिगर मागास व मागास) प्रतिदिनी रु. १०/- प्रमाणे अतिविलंब शुल्क भरावे लागेल.

- **बँक शुल्क -**
    - SBI किंवा SBH करीता प्रत्येक चलनासाठी रु. २०/- इतके भरावे लागेल

---

- **सूचना -**
    - अचूक व पूर्ण माहिती भरल्याची खात्री झाल्यावर Save and New या बटनावर क्लिक करा.
    - त्यानंतर नवीन विद्यार्थ्यासाठी आवेदनपत्र स्क्रीनवर उपलब्ध होईल.
    - परीक्षेस बसण्यास इच्छुक असलेल्या सर्व विद्यार्थ्यांची ऑनलाईन आवेदनपत्रे भरल्यानंतर स्क्रीनवरील उजव्या बाजूस असलेल्या Home बटनावर क्लिक करा.
    - List बटनावर क्लिक केल्यावर जेवढया विद्यार्थ्यांची ऑनलाईन आवेदनपत्रे भरली असतील त्यांची यादी (Check List) 'विद्यार्थी पडताळणी यादी' स्क्रीनवर उपलब्ध होईल.
    - Check List ची प्रिंटआऊट घेऊन सर्व विद्यार्थ्यांची मुद्देनिहाय माहिती अचूक असल्याची खात्री करावी.
    - माहितीत बदल करायचा असेल तर ऑनलाईन Check List (विद्यार्थी पडताळणी यादी) मधील संबंधित विद्यार्थ्याचा फॉर्म उघडून माहितीत बदल करु शकता.
    - सर्व माहिती पूर्ण व अचूक भरली असल्याची खात्री झाल्यानंतरच चलनाची प्रिंटआऊट घ्यावी.
    - चलनाची प्रिंटआऊट घेतल्यानंतर आवेदनपत्रातील माहितीत बदल/सुधारणा करता येणार नाही.
    - SBI किंवा SBH (भारतीय स्टेट बँक किंवा स्टेट बँक ऑफ हैद्राबाद) च्या कोणत्याही शाखेत चलनाद्वारे रक्कम भरावी.
    - परीक्षा परिषदेच्या संकेतस्थळावर पुन्हा Login करुन चलनावरील Transaction ID नमूद करुन चलन Update करावे.
    - चलन Update झाल्यानंतरच परीक्षेस बसलेल्या विद्यार्थ्यांची यादी 'प्रपत्र अ' (List of Applicants) ची प्रिंटआऊट मिळेल.
    - गटशिक्षणाधिकारी/वॉर्ड ऑफिसर यांचेकडे 'प्रपत्र अ' ची मूळ प्रत, असल्यास प्रमाणपत्रे (विद्यार्थ्याच्या पालकाचे उत्पन्न २०,०००/- रुपयांपेक्षा कमी असल्याचे सक्षम अधिकाऱ्याचे प्रमाणपत्र, विद्यार्थ्याचे पालक भूमिहीन शेतमजूर असल्याचे सक्षम अधिकाऱ्याचे प्रमाणपत्र) व चलनाची प्रत (MSCE copy) जमा करावी.
    - 'प्रपत्र अ' ची झेरॉक्स प्रत काढावी. याच प्रतीवर केंद्रप्रमुख/गटशिक्षणाधिकारी यांची स्वाक्षरी घेऊन पोहोच घ्यावी. त्यानंतर विहीत रकान्यात विद्यार्थी व पालकांची स्वाक्षरी घ्यावी. ही प्रत शाळेत कायमस्वरुपी जतन करुन ठेवावी.

# MSS/HSS (शिष्यवृत्ती) परीक्षा २०१५

## गटशिक्षणाधिकारी/वॉर्ड ऑफीसर यांच्यासाठी सूचना

१) इयत्ता ४थी, ७वी शिष्यवृत्ती परीक्षेच्या कामकाजासाठी सर्व गटशिक्षणाधिकारी/वॉर्ड ऑफिसर यांना परीक्षा परिषदेकडून Login Id व Password देण्यात येईल.

२) त्यासाठी सर्व गटशिक्षणाधिकारी/वॉर्ड ऑफिसर यांनी परिषदेच्या www.mscepune.in या संकेतस्थळाच्या Home Page वरील BEO Information Gateway मध्ये माहिती भरणे आवश्यक आहे. राज्यात एकूण ४०६ शैक्षणिक तालुके/वॉर्ड आहेत.

३) मुंबई जिल्ह्याच्या बाबतीत बृहन्मुंबई मनपा अंतर्गत असणाऱ्या चोवीस (२४) आणि शिक्षण निरीक्षक मुंबई (उ/द/प) यांच्या अखत्यारीतील चोवीस (२४) अशा एकूण ४८ वॉर्ड ऑफिसर यांनी स्वतंत्रपणे BEO Information Gateway मध्ये माहिती भरणे आवश्यक आहे.

उदा. १) पूर्व माध्यमिक शाळा शिष्यवृत्ती (इ.४थी) परीक्षेचे काम पाहणाऱ्या दक्षिण मुंबई जिल्ह्यातील दादर वॉर्ड आफिसर यांनी Dadar तालुका ड्रॉपडाऊन लिस्टमधून निवडून माहिती भरावी.

२) मुंबई दक्षिण जिल्ह्यातील माध्यमिक शाळा शिष्यवृत्ती (इ. ७वी) परीक्षेचे काम पाहणाऱ्या दादर वॉर्ड ऑफिसर यांनी Dadar 7th STD तालुका ड्रॉपडाऊन लिस्टमधून निवडून माहिती भरावी.

४) BEO/Ward Officer यांनी आपल्या तालुका वॉर्डातील शाळांना शिष्यवृत्ती परीक्षेची ऑनलाईन आवेदनपत्रे भरताना येणाऱ्या अडचणींबाबत मार्गदर्शन करावयाचे आहे.

५) शाळेने ऑनलाईन भरलेली माहिती जसे की, शाळा माहिती प्रपत्र (School Profile), ४थी/७वी आवेदनपत्रे, शुल्क भरुन चलन Update करणे, इत्यादी बाबतची माहिती तालुका/वॉर्ड स्तरावर Login केल्यानंतर आपणास उपलब्ध होणार आहे. त्यामुळे कोणत्याही टप्प्यावर आवेदनपत्र भरण्याची प्रक्रिया अपूर्ण असलेल्या आपल्या तालुका/वॉर्डातील शाळांशी वेळोवेळी संपर्क साधून पाठपुरावा करणे शक्य होणार आहे.

६) त्यासाठी परिषदेच्या संकेतस्थळावरील शिष्यवृत्ती परीक्षेविषयीची माहिती, कृतीओघ तक्ता, शाळा माहिती प्रपत्र व आवेदनपत्रांचे नमुने, वेळापत्रक, अधिसूचना व इतर माहिती यांचे वेळोवेळी अवलोकन करावे. तसेच तालुक्यातील विस्तार अधिकारी, केंद्रप्रमुख यांना मार्गदर्शन करावे.

७) **'प्रपत्र अ' ची नोंद (केंद्रप्रमुख स्तर) -**

- कार्यालयीन कामकाजाच्या दिवशी दररोज शाळांकडून प्राप्त होणारे 'प्रपत्र अ', त्यासोबतची प्रमाणपत्रे व शुल्क भरल्याच्या चलनाची प्रत (MSCE Copy) यांचे संकलन केंद्रप्रमुखांच्या स्तरावर गटशिक्षणाधिकारी/वॉर्ड ऑफिसर यांच्या वतीने केंद्रप्रमुखांनी करावयाचे आहे.
- यासाठी केंद्रप्रमुखांनी ४थी व ७वी साठी स्वतंत्र रजिस्टर ठेवावे.
- 'प्रपत्र अ' मधील माहितीनुसार आवश्यक प्रमाणपत्रे व बँकेत शुल्क भरल्याच्या चलनाची प्रत यांची पडताळणी करावी.
- 'प्रपत्र अ' स्वीकारण्याच्या अखेरच्या दिवशी प्राप्त झालेल्या शाळांची नोंद तात्काळ करुन पुढील कार्यालयीन कामकाजादिवशी गटशिक्षणाधिकारी/वॉर्ड ऑफिसर यांचेकडे 'प्रपत्र अ', आवश्यक प्रमाणपत्रे व चलने तात्काळ जमा करावीत.
- या सूचनापत्रात पुढे नमूद केलेल्या नमुन्यानुसार 'प्रपत्र अ' प्राप्त झाल्याची नोंद दिनांकानुसार रजिस्टरमध्ये करावयाची आहे.

- 'प्रपत्र अ' केंद्रप्रमुखांनी जमा करुन घ्यावयाचे आहे, यासाठी शाळांना गटशिक्षणाधिकारी/वॉर्ड ऑफिसर यांच्या कार्यालयाकडे पाठवू नये.
- 'प्रपत्र अ' शाळेने जमा केल्यानंतर केंद्रप्रमुख यांनी गटशिक्षणाधिकारी/वॉर्ड ऑफिसर यांच्या वतीने शाळेस पोहोच द्यावी.

८) **'प्रपत्र अ' ची नोंद (गटशिक्षणाधिकारी/वॉर्ड ऑफिसर स्तर) -**

- केंद्रप्रमुखांकडे शाळांनी जमा केलेल्या 'प्रपत्र अ' च्या सर्व प्रती, त्यासोबतची प्रमाणपत्रे व शुल्क भरलेली चलने (MSCE Copy) आठवडयातून दोनदा (सोमवारी व गुरुवारी) गटशिक्षणाधिकारी/वॉर्ड ऑफिसर यांनी केंद्रप्रमुखांकडून प्राप्त करुन घ्यावीत.
- तालुका स्तरावरही ४थी, ७वी साठी स्वतंत्र रजिस्टरमध्ये पुढे नमूद केलेल्या नमुन्यानुसार नोंदी ठेवाव्यात.
- तालुका/वॉर्ड स्तरावरही 'प्रपत्र अ' मधील माहितीनुसार आवश्यक प्रमाणपत्रे व बँकेत शुल्क भरल्याच्या चलनाची प्रत यांची पडताळणी करावी.
- तसेच 'प्रपत्र अ' प्राप्त झालेल्या दिवशीच या परीक्षेसाठी BEO/Ward Officer यांनी परिषदेकडून प्राप्त झालेल्या User Id व Password द्वारे Login करुन ऑनलाईन नोंदी कराव्यात.

९) तालुका/वॉर्ड स्तरावर 'प्रपत्र अ' प्राप्त झाल्याची ऑनलाईन नोंद झाल्यानंतरच संबंधित शाळेची आवेदनपत्र भरण्याची प्रक्रिया पूर्ण होणार आहे. त्यामुळे या ऑनलाईन नोंदी वेळोवेळी करण्याबाबत दक्षता घ्यावी.

१०) कॉम्प्युटर प्रोग्रॅमर, संगणक संच, इंटरनेट सुविधा नसल्यास वॉर्ड ऑफिसर यांनी जिल्हा मुख्यालयात ऑनलाईन नोंदी कराव्यात.

११) आपल्या तालुका/वॉर्डातील आवेदनपत्राबाबतच्या वेळोवेळी कागदोपत्री व ऑनलाईन नोंदी ठेवणे ही संबंधित गटशिक्षणाधिकारी/वॉर्ड ऑफिसर यांची जबाबदारी राहील.

१२) **आवेदनपत्रे भरण्यासाठी सुविधा उपलब्ध करणे -**

- काही तालुका/वॉर्डात ऑनलाईन आवेदनपत्रे भरण्यासाठी अडचणी येऊ शकतात. अशा तालुका/वॉर्डांनी पुढीलप्रमाणे कार्यवाही करावी.
- स्थानिक स्वराज्य संस्थेच्या शाळांची (जि.प/मनपा/नपा, इ.) ऑनलाईन आवेदनपत्रे तालुका/वॉर्ड स्तरावर आपल्या कार्यालयात भरुन घ्यावीत.
- तालुका/वॉर्डातील शाळांना सूचना देऊन व दिनांकानुसार आवेदनपत्र भरण्याचा कार्यक्रम ठरवून आपल्या कार्यालयात आवेदनपत्रे भरुन घ्यावीत.
- तालुका/वॉर्ड स्तरावर आवेदनपत्रे भरणाऱ्या शाळांना 'प्रपत्र अ' जमा करण्यासाठी केंद्रप्रमुखांकडे पाठविण्याची आवश्यकता नाही. आपल्या स्तरावरच 'प्रपत्र अ' सहपत्रांसह जमा करुन घ्यावे.

१३) याबाबत परीक्षा परिषदेकडून तसेच विभाग व जिल्हा स्तरावरुन मिळणाऱ्या सूचनांनुसार वेळोवेळी कार्यवाही करावी. तसेच अद्यावत माहिती तयार ठेवावी.

१४) ज्या शाळांना **UDISE Code** माहित नसेल त्यांना तो मिळवून द्यावा (UDISE Code महाराष्ट्र प्राथमिक शिक्षण परिषद, मुंबई यांच्याकडून देण्यात येतो).